Umed
New Horizon, Renewed Confidence...

# स्वयं सहायता गट - बँक लिंकेज मेळावा

**ठिकाण:** *अलाहाबाद बँक, येळाकेळी ता. सेलू, जिल्हा वर्धा*

*दिनांक : २२/११/२०१४*





स्वयंसहायता गट- बँक लिंकेज मेळावा अलाहाबाद बँकेच्या परिसरामध्ये आयोजित करण्यात आला. या मेळाव्यामध्ये १५ स्वयं सहायता गटांना प्रथम लिंकेज करिता बोलविण्यात आले होते. सर्व गट मेळाव्यास उपस्थित होते.

सर्व प्रथम शाखा व्यवस्थापक श्री. दिनेश वासनिक यांनी सर्व गटांचे स्वागत केले व प्रत्येक गटाच्या तीन पदाधिकाऱ्याना गटाचे रेकॉर्ड व बँक पासबुक घेऊन त्यांच्या कक्षामध्ये बोलावण्यात आले. प्रत्येक गटाचे रेकॉर्ड तपासण्यात आले व गट पंचसुत्रीचे/ दशसुत्रीचे पालन करतो किंवा नाही याची खात्री करण्यात आली.

त्यानंतर बँकेतर्फे गटांचे ग्रेडेशन करण्यात आले. तसेच त्यांना कर्जाचा वापर कुठल्या कारणासाठी करणार व त्याची परतफेड गट कसा करणार याची माहिती घेण्यात आली. त्यठिकाणी सर्व उपस्थित सी.आर.पी, ४ बँक मित्र, तालुका व्यवस्थापक, क्लस्टर को-ओर्डीनेटर, २ संघटिका यांनी प्रत्येक ग्रेडेशन झालेल्या गटांचे बँकेद्वारे दिल्या गेलेल्या कागदपत्रामध्ये माहिती भरणे (documentation) हे काम केले. गटाच्या सर्व सदस्यांच्या व पदाधिकाऱ्यांच्या सह्या घेण्यात आल्या.

या मेळाव्याच्या फलस्वरूप १५ गटांना एकाच दिवशी प्रथम लिंकेज करिता एकूण रु.१६०००००/- (रुपये सोळा लाख) मंजूर करण्यात आले.

